PlanetRead
Literacy for a Billion

Movie: Shabas sunbai
Year: 1986

Song: Navratricha utsav kela
Lyricist:

नवरात्रीचा उत्सव केला
मुली बाळीचा जागर
नवरात्रीचा उत्सव केला
मुली बाळीचा जागर
मराठमोळा मुली खेळूया
झिम्मा फुगडी घागर
मराठमोळा मुली खेळूया
झिम्मा फुगडी घागर
या गं सयांनो या बायांनो
पदर सावरा गर्तीचा
या गं सयांनो या बायांनो
पदर सावरा गर्तीचा
मराठमोळा खेळ खेळूया
गंमतीचा नवतीचा
मराठमोळा खेळ खेळूया
गंमतीचा बाई नवतीचा
घ्या घ्या गं
पेशल खोबऱ्याल त्याल
आम्ही बाई सुना गं
तेल्याच्या तेल्याच्या
भेसळ खोबरं मिसळायच्या
बाई मिसळायच्या
या गं सयांनो या बायांनो
पदर सावरा गर्तीचा
मराठमोळा खेळ खेळूया
गंमतीचा बाई नवतीचा

आम्ही बाई सुना गं
माळयाच्या बाई माळयाच्या
आम्ही बाई सुना गं

माळयाच्या बाई माळयाच्या
शिळी फुल शिळी फुलं
ताजी म्हणून इकायच्या इकायच्या

या गं सयांनो या बायांनो
पदर सावरा गर्तीचा
मराठमोळा खेळ खेळूया
गंमतीचा बाई नवतीचा

अगं शिवशील शिवशील शिंचे
आम्ही बाई सुना गं
ब्राम्हणाच्या ब्राम्हणाच्या
ब्राम्हणाच्या
इश्य शिवू नको
शिवू नको शिवू नको
म्हणायच्या म्हणायच्या

या गं सयांनो या बायांनो
पदर सावरा गर्तीचा
मराठमोळा खेळ खेळूया
गंमतीचा बाई नवतीचा

आम्ही बाई लेकी मराठी मराठी
मराठी गं मराठी
आम्ही बाई लेकी मराठी मराठी
मराठी गं मराठी
हाब हाब म्हणायच्या बाई म्हणायच्या
बामनावानी ओवी पोवी
नाही आम्ही म्हणायच्या
या गं सयांनो या बायांनो

पदर सावरा गर्तीचा
मराठमोळा खेळ खेळूया
गंमतीचा बाई नवतीचा

आम्ही बाई मुली
शाळेच्या शाळेच्या शाळेच्या
नट नट्यांची नावं तोंडपाठ
अभ्यासाला बुट्टी
शाळेला सुट्टी
नाटक शिनेमा
बघायच्या बघायच्या

या गं सयांनो या बायांनो
पदर सावरा गर्तीचा

मराठमोळा खेळ खेळूया
गंमतीचा नवतीचा
मराठमोळा खेळ खेळूया
गंमतीचा नवतीचा
मराठमोळा खेळ खेळूया
गंमतीचा नवतीचा
मराठमोळा खेळ खेळूया
गंमतीचा नवतीचा
मराठमोळा खेळ खेळूया
गंमतीचा नवतीचा
गंमतीचा बाई नवतीचा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*